## कृतज्ञता - ऋणनिर्देश

अष्टां महागंदापैकी उदरस्थ रोगविशेष · उदर रोगाचे प्रत्यक्षात अनेक रुग्णांचे निरीक्षण केले त्या सर्व रुग्णाची मी व्यक्तिशः आभारी आहे·

आयुर्वेदीय फॅकल्टीचे डीन वैद्य पी· एच· कुलकर्णी यांनी सदर प्रबंध लिहीण्यास उत्तेजन दिल्याबददल मी त्यांची ऋणी आहे·

आयुर्वेदीय सिध्दांत - तत्व प्रत्यक्ष प्रबंधामध्ये मूर्त , स्वस्मांत आणाण्यास आणि त्यावरुन कांही निष्कर्ष निघतात कां ते पहाण्यासाठी

वैद्य स· प्र· सरदेशमुख
प्राध्यापक :- कार्यचिकित्सा विभाग
अष्टांग आयु· महाविद्यालय

यांनी जे अचूक मार्गदर्शन केले त्याबददल मी त्यांचे आभार मानते·

सध्या मी ज्या महाविद्यालयांत अध्यापन करीत आहे तेथील प्रिन्सीपॉल माननीय लाटाणी , गुरुवर्य श्रीरामजी शर्मा वैद्य हरीप्रसाद शर्मा यांनी ही चिकित्सेतील काही उपयुक्त तत्वविस्तार केला, व वेळोवेळी उत्तेजन दिले त्याबद्दल त्यांचे आभार मानते·

प्रबंध लिहीण्याबददल सतत जागृत करुन प्रेरणा देण्याबददल पूज्य श्री· मातोश्रींचे मी आभार मानते·

तसेच माझे बंधू डॉ. म. ह. परांजपे, एम. डी. असून आयुर्वेदाचे पदवीधर , असून अष्टांग आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्रिन्सिपॉल -पदाचा सर्व व्याप संभाळून प्रबंध मूर्त स्वरूपात येण्यासाठी त्यांनी जे सर्वतोपरी मार्गदर्शन व सहाय्य केले त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

आयुर्वेदाबद्दल नितांत आदर असणारे माझे पति व माझ्या सौ. सासूबाई यांनी मला सहकार्य केले नसते तर मला हे प्रबंध लेखन पूर्ण करणे शक्य नव्हते.

पूणे येथील ससून हॉस्पिटल शेठ ताराचंद रामनाथ रुग्णालय अष्टांग रुग्णालय मुंबईचे सायन हॉस्पिटल , पोदार आयु. हॉस्पिटल श्री. क. गो. मि. पुनर्वसु हॉस्पिटल येथील गुरुजन, माझे सहकारी व सेवकवर्ग या सर्वांनी मला वेळोवेळी सहाय्य केले, त्या सर्वांची मी आभारी आहे.

या प्रबंध लेखनाचे टाईपिंगचे काम करणे ही एक आवश्यक बाब आहे. त्यासाठी कष्ट घेणाऱ्या क्लार्क वर्गाचे मी आभार मानते.

प्रबंध लेखिका

वैद्य सौ. रजनी पु. नामजोशी